(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ताः mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/सभा-९८/आ-४/१९५.. दिनांक : ११.८.२००४

विषय : **दिनांक ४ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९८ व्या सभेचे इतिवृत्त..**

दिनांक ४ ऑगस्ट, २००४ रोजी दुपारी ४.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९८वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सोबत सादर करण्यांत येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**( दीपक भोसाळे )**
सदस्य सचिव

किंचित सुधारल्याप्रमाणे मान्य करावे.
११/११/०४

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व. विभाग**

**मा.मंत्री,**
**ग्रा.वि., पा.पु. व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

nng..Sabha..

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९८ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९८ वी सभा मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा. नामदार श्री.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४ ऑगस्ट, २००४ रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झाली. या सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री. अजित पवार, मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व. तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष.
२) श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३) श्री.सुनिल तटकरे, मा. राज्यमंत्री, नगर विकास, तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४) श्री.बी.सी. खटुआ, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
५) श्री.एस.एस. हुसेन, प्रधान सचिव, ग्रा.वि.वि. तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
६) श्री.जे.एस.सहानी, प्रधान सचिव, उर्जा तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
७) श्री. दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.पांढरीपांडे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, नवी मुंबई.
२) श्री.एस.व्ही. दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
३) श्री.शेखर गायकवाड, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
४) श्री. मिलिंद केळकर, विशेष कार्य अधिकारी, पा.पु.व स्व., मंत्रालय, मुंबई.
५) श्री.वेंकट कल्याणकर , अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. ठाणे.
६) श्री.डी.सी. सुर्यवंशी, अधीक्षक अभियंता (मुख्यालय) म.जी.प्रा., मुंबई-२१
७) श्री. हेमंत लांडगे, अधीक्षक अभियंता (समन्वय ), एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई-२१

मा. मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.१ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १७ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १७व्या सभेमध्ये ज्या कार्यक्रम बाबी सादर करण्यांत आल्या होत्या त्यावर झालेल्या चर्चेनुसार जे इतिवृत्त तयार करण्यांत आले त्यास मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १७ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

(अ) पुणे येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर वापरा व हस्तांतर करा ( B.O.T.) याबाबत मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी अध्यक्षांच्या असे निर्देशनास आणून दिले की, प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेबाबत महसूल व वन विभागाचे आदेश प्राप्त झाल्यानंतरच सदर जागा प्राधिकरणाच्या नांवे करण्यांत येईल असे जिल्हाधिकारी पुणे यांचे मत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अनेक जागांबाबत असा प्रश्न असल्याचे देखील संचालक मंडळास अवगत करण्यांत आले. त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदयातील कायदेशीर तरतूद, सचिव (महसूल ) यांच्या निदर्शनास आणून सर्व ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नांव अधिकार अभिलेखात येण्यासाठी प्रधान सचिव, पाणी पुरवठा यांनी पाठपुरावा करुन पुढील कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सुचित केले.

ब) १७ व्या सभेतील कार्यक्रम बाब क्र. १० व आयत्या वेळेच्या कार्यक्रम बाबीकडे प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांनी लक्ष वेधून प्राधिकरणाकडून केलेल्या कृतीमध्ये कार्यवाही अपेक्षीत आहे असे नमूद आहे. वास्तविक पहाता सदर कार्यक्रम बाबीवर अंतिम कार्यवाही पूर्ण करुन तशी नोंद केली गेली पाहिजे. तसेच बीड वाढीव पाणी पुरवठा योजने संदर्भात नक्की कोणती कार्यवाही करण्यांत आली त्याची माहिती पुढील बैठकीपुढे ठेवावी अशी सुचित केले.

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला योजनांसाठी सन २००४-०५ नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी उपलब्ध निधी व त्यानुसार कामाच्या अंमलबजावणीचे नियोजन..

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांनी ही कार्यक्रम बाब संचालक मंडळासमोर ठेवण्याचे प्रयोजन काय असे विचारले असता मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाच्या माहितीसाठी ठेवल्याचे नमूद केले. मा. प्रधान सचिव, उर्जा यांनी नागरी व ग्रामीण योजनांबाबतचा मजकूर व तक्त्यातील माहिती जुळत नसल्याचे नमूद केले. तसेच पूर्ण झालेल्या ९८७ ग्रामीण योजनांना पूर्ण निधी वितरित करावा असे सूचित केले. तसेच हयापुढे ही बाब प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवतांना नागरी व ग्रामीण योजनांवर त्यांचे प्रगती निहाय प्राधान्य ठरवून त्यावर उपलब्ध निधी किती आहे हयाचा तपशिल नमूद करावा असे सूचित केले.

सदस्य सचिव हयांनी नागरी योजनांवर हुडको ५२ योजनासाठी रु. ३२३ कोटी, ३२ योजनासाठी १५४.०० कोटीचे कर्ज नगरपालिकांनी अटीची पूर्तता न केल्यामुळे हुडकोने रद्द केले असल्याचे कळविले असे नमूद केले. तसेच गेली २/३ वर्षे आयुर्विमा कर्जही न मिळाल्यामुळे कर्जा अभावी नागरी पाणी पुरवठा योजनांवर प्रमाणशीर खर्चांच्या अनुषंगाने शासकिय अनुदान ही पूर्णपणे खर्ची पडणार नसल्याचे सांगितले. हयावर हयाबाबत सर्व नगरपरिषदांना स्वतंत्रपणे व लेखी कळविण्यात यावे असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.४ :** कन्हैयानगर, कोपरी, ठाणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये चौथ्या मजल्यावर बैठकीकरिता हॉल बांधणे..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २७ जानेवारी, २००४ रोजी झालेल्या ९६ व्या सभेपुढील कार्यक्रम बाब क्र.२० अन्वये वरील प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. मुख्य अभियंता, (कोकण विभाग ) ठाणे यांचे कार्यालयाच्या ४थ्या मजल्यावर १२५.०७ चौ.मि. क्षेत्रफळाचे समिती हॉल व इतर बांधकाम करावयाचे होते. दिनांक २.२.२००४ रोजी मा. मंत्री, ग्राम विकास , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा अध्यक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी कन्हैयानगर कोपरी , ठाणे येथे भेट दिली असता यापूर्वी मंजुर कामात बदल सूचविल्यामुळे समिती हॉलचे क्षेत्रफळ १७०.०० चौ.मी. झाले व त्यामुळे अंदाजित किंमत रु. ३४.०४ लक्ष

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव ,**
**म.जी.प्रा.**

झाली व त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या आहेत व लवकरच कामास सुरुवात होत आहे. त्यासाठी सुधारित खर्च रु. ३४.०४ लक्ष अपेक्षित आहे असे निदर्शनास आणून दिले. सदर प्रस्तावावर सर्वकष चर्चा केली. त्यास मा. अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. ५ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आदिवासी क्षेत्रातील कार्यरत कर्मचा-यांना शासनाच्या धर्तीवर प्रोत्साहन भत्त्याची योजना लागू करणेबाबत..

शासन निर्णयाच्या अधिन राहून सदर योजना प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना लागू करण्यासाठी ठेवण्यात आल्याचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. तथापी मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अतिशय पाठपुरावा करुन ५वा वेतन आयोग तसेच सेवानिवृत्तांसाठी ५वा वेतन आयोग व कालबध्द पदोन्नतीची योजना व ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करणारे निर्णय घेतल्याचे सांगितले. त्यामुळे मोठा वित्तीय भार यापूर्वीच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर पडला आहे. अनेक महामंडळांना ५वा वेतन आयोगसुध्दा अद्याप लागू केलेला नाही. अशा परिस्थितीत व विशेषतः पाणी पुरवठा केंद्राचा कर्मचारी वर्ग आदिवासी व नक्षलग्रस्त भागात सातत्याने फिरतीवर नसतो या पार्श्वभूमीवर आणखी वित्तीय भार वाढवणारी ही योजना लागू करण्यांत येवू नये असे प्रधान सचिव यांना सूचित केल्याने मा. अध्यक्षानी सदर प्रस्ताव नामंजूर केला.

**कार्यक्रम बाब क्र.६ :** सन २००३-२००४ यावर्षी कर्ज रोखे मालिका-११ द्वारे जास्तीची प्राप्त झालेली रक्कम सन २००४-२००५ या वर्षाच्या तरतूदीपोटी ठेऊन घेण्याबाबत..

सदरहू बाबीबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी संचालक मंडळास अवगत केले. कर्जरोखे मालिका ११ ला बाजारात चांगला प्रतिसाद मिळाल्याने मंजुर रु.१०० कोटी रक्कमेपेक्षा रु.१०१.१० कोटी जास्त जमा झाली होती. या जास्त रक्कमेस शासनाने मंजूरी दिली होती. त्यानुसार ३१.३.२००४ पर्यंत जमा झालेली रु. १४५.७६ कोटी सन २००३-२००४

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

वर्षाच्या तरतूदीपोटी (जी १.४.२००४ नंतर जमा झाली होती. ) ठेऊन उर्वरित रु. ५५.३४ कोटी रक्कम सन २००४-२००५ च्या वार्षिक तरतूदीपोटी समायोजीत करुन ठेऊन घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी संचालक मंडळासमोर ठेवलेल्या या ठरावास सर्वानुमते मंजूरी दिली आहे.

राज्यामध्ये ९टक्के दराने कर्जरोखे उभा करुन प्राधिकरणाने उल्लेखनीय कार्य केले असून ही बाब इतरही महामंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे असे मा. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा), हयांनी नमूद केले व सदरहू बाब शासनाने इतर संबंधीत विभागाच्या निदर्शनास आणावी असे सूचित केले.

**कार्यक्रम बाब क्र.७ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कर्ज रोखेद्वारे उभारण्यात आलेल्या निधीची पूट / कॉल ऑप्शनद्वारे परतफेड.

सदरहू बाब प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आली असल्याने याबाबत कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.

**कार्यक्रम बाब क्र. ८ :** म.जी.प्रा. च्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणे..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या ४५व्या बैठकीमध्ये घेण्यांत आलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले व या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी असे निर्देश देण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९ :** माथेरान गिरीस्थान (ता. कर्जत , जि.रायगड ) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयाच्या दराबाबत..

माथेरान पाणीपट्टी दराच्या संदर्भात मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी या केद्रातून पाणीपट्टीद्वारे मिळणारे उत्पन्न व पाणी पुरवठा करण्यासाठी येणारा खर्च यांची

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सांगड घालून लागू करण्यात आलेल्या दरांबाबत संचालक मंडळास अवगत केले. तसेच माथेरान हॉटेल असोशिएशनने दरवाढी विरुध्द उच्च न्यायालयात केलेला याचिका फेटाळण्यात आली आहे, हयाबाबतही संचालक मंडळास अवगत केले. त्यानंतर ही सातत्याने ही असोशिएशन दर कमी करण्याची मागणी करीत असल्याचे त्यांनी सांगीतले. याबाबत मा. राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे नमूद केले की, "पूर्वीच्या दरामध्ये एकदम वाढ न करता दरवर्षी साधारण १० टक्के या दराने वाढ करावी व सद्याचे प्रस्तावित दर कमी करण्यात यावेत असे सुचित केले. यावर मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी गिरीस्थान हॉटेल असोसिएशनच्या वारंवार प्राप्त होणा-या दर वाढीच्या तक्रारीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुनच दर यापूवी एकदा कमी केल्याचे नमूद केले. तथापी मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समन्वयाने प्रस्तावित दर आणखी कमी करण्याचे सुचविले. त्यानुसार माथेरान पाणी पुरवठा केंद्रासाठी अंतिमतः खालील प्रमाणे दर लागू करावेत अशी त्यांनी मागणी केली: —

मेरीट वर

| प्रवर्ग | सद्याचे दर | कमी करावयाचे दर |
|---|---|---|
| अ वर्ग | रु. ७५/- | रु. ६५/- |
| ब वर्ग | रु. ६०/- | रु. ५७.५० पैसे |
| क वर्ग | रु. ५०/- | रु. ५०/- |

तथापि मा. अध्यक्ष यांनी पुढील बैठकीत वरील सर्व मुद्दे विचारात घेऊन दर कमी करता येणे शक्य आहे काय?, ते तपासून पुढील बैठकीपुढे कार्यक्रम बाब सादर करावी असे निर्देश दिले.

**कार्यक्रम बाब क्र. १० :** सिडको भवन येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मध्यवर्ती कार्यालयाचे ( १ ते ४ मजले ) नुतनीकरण करणेबाबत..

सिडको भवन येथील दुस-या व तिस-या मजल्यांचे नुतनीकरण व अंतर्गत सजावट इत्यादिसाठी रु.२.६० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यास संचालक मंडळाने मंजूरी दिली. सदर खर्च शासनाकडून अनुदानापोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देणेबाबत

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

मा. अध्यक्ष यांनी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना निर्देश दिले असून याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

उपरोक्त चर्चेनंतर मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित केले.

**मा.अध्यक्ष तथा**
**मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**